**CNR No.MHSI010006962017**

## निशाणी ५८ खालील आदेश

अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं ०५ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी विलंबमाफीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडेंट नं. २ यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, रिस्पॉडेंट नं. ५ इम्रान अब्दुल सत्तार खान हे दिनांक २४/०९/२०२३ रोजी जोगेश्वरी, मुंबई येथे मरण पावलेले आहेत. त्यांना रिस्पॉडेंट नं. ५अ, ५ब व ५क हे वारस आहेत. याशिवाय दुसरे वारस नाहीत. सदर अपिल प्रलंबित असताना अपेलंट यांना रिस्पॉडेंट यांच्या मृत्यूची माहिती वेळेत मिळाली नाही. त्यामुळे माहिती झाल्यानंतर लगेच वारसाचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्ज दाखल करण्यास २२० दिवस एवढा विलंब झालेला आहे. तो विलंब जाणूनबूजून केलेला नाही. त्यामुळे झालेला विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. रिस्पॉडंट नं. २ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे की, अपेलंट यांनी दिलेले कारण स्वीकृत करता येणार नाही. दिलेले कारण कायदेशिर नाही. त्यामुळे तो चालण्यास पात्र नसल्यामुळे तो अर्ज नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉडंट याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. ५ यांचे वारस वेळेत अपिलामध्ये समाविष्ट

केलेले नाही. अपेलंट यांचे अर्जामध्ये कथन की मयता बाबत माहिती उपलब्ध झाली नव्हती त्यामुळे वेळेत वारस दाखल करता आलेले नाहीत. या कारणांचा विचार करता रिस्पॉडेंट नं. ५ यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अपिलाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यासाठी अपेलंट यांना संधी देणे योग्य व न्यायाचे होणारे आहे. त्यामुळे अपेलंट याने दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अपेलंट यांचा निशाणी ५८ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. अपेलंट यांचा झालेला विलंब हा माफ करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.11.12 10:42:41 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १०/११/२०२५

( श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.